नि.दि.दावा.क्र. ५५/२०२४
सुशिला वि. सहादेव
निशाणी क्र. ९०

वादीतर्फे साक्षीदार क्र. २
मी शपथेवर सांगतो की,

नाव- हरिष रामचंद्र वैद्य,
वय-३६ वर्षे, धंदा- नोकरी, छाणणी लिपीक,
उप अधिक्षक, भुमी अभिलेख शाखा, कामठी.

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आनंद गजभिये यांच्यातर्फे सुरु-

१. दिनांक १३/१०/२०१९ रोजी मी मौदा येथील भुमि अभिलेख कार्यालयामध्ये अभिलेखापाल म्हणुन कार्यरत होतो. मोजणी क्र.१५३९ मौजा-कोराड येथील हे प्रकरण माझ्याजवळ मोजणीसाठी होते. सदर प्रकरणामध्ये सर्वे नं. १३४ची मोजणी करणे होते. मोजणीचा अर्ज हा लाबका ग्रामपंचायत सचिव यांनी केला होता. मी दिनांक २३/१०/२०१९ ला घटनास्थळावर जावुन मोजणी केली होती. मोजणीपुर्वी संबंधीत लोकांना नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. मी मोजणीची कारवाही ही पुर्वीच्या उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे केली होती. मी मोजणी ही प्लेन टेबल पद्धतीने केली होती. घटनास्थळावर अर्जदाराने दाखविलेल्या वहीवाटीप्रमाणे आणि पुर्वीच्या प्रचलित नकाशाप्रमाणे मोजणी केली होती. त्यावरुन मी मोजणीची 'अ', 'ब' प्रत आणि 'क' प्रत बनविली. आज रोजी मी मोजणीच्या नकाशाची मुळ प्रत 'अ' प्रत आणलेली आहे. आता साक्षीदाराला आर्टीकल 'अ', मोजणी नकाशा दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर नकाशा हा मुळ प्रत 'अ' प्रमाणे बरोबर आहे. सदर नकाशातील मजकुर हा देखिल मुळ नकाशातील मजकुराप्रमाणे बरोबर आहे. सदर मोजणी नकाशा, आर्टीकल 'अ' ला नि.क्र. ९१ देण्यात येत आहे. मोजणी नकाशामध्ये, अ-ब-क-ड या अक्षरामध्ये दाखविलेले हे प्रतिवादी सहादेव बाबुराव शेंडेचे बांधकाम आहे. सदर बांधकाम हे सर्वे नं. १३४/१ब मध्ये आहे. मोजणीच्या वेळेस प्रतिवादी सहादेव शेंडे हजर नव्हते. मोजणीच्यावेळी जे हजर होते त्यांची नावे आणि त्यांच्या सहया घेण्यात आलेल्या आहेत.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे करीता सुविज्ञ विधीज्ञ पी.टी.गजवे यांद्वारे -

२. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी क्र. १५३९ चा अर्ज तहसिलदार यांच्या मार्फत आला होता. मौजा कोराड येथील शासकिय ले-आउट ची मोजणी करण्याबाबतचा अर्ज होता. टीप क्र.२ मध्ये नमुद केलेला मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की मोजणी क्र.१५३९ ही पोट हिस्स्याबाबत होती. सहादेव शेंडे यांचे नाव अभिलेखात नसल्यामुळे त्यांना नोटीस पाठविण्यात आली नव्हती. प्रचलित नकाशे म्हणजे, जो अभिलेख चालु आहे तो नकाशा. चालु नकाशामध्ये पुनःमोजणी

नकाशा हा वापरला आहे. हे म्हणणे खरे आहे की मोजणी नकाशामध्ये सातबारा नुसार किती क्षेत्रफळ आहे आणि प्रत्यक्षात किती आहे याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की नकाशामध्ये, अर्जदाराच्या ताब्यानंतर, सहादेव शेंडेचे बांधकाम आहे. सदर बांधकाम हे अर्जदाराच्या ताब्यात असलेल्या जागेमध्ये नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.08.21 17:05:04 +0530

दिनांक २०.०८.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)